# न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक ०९ जानेवारी २०२३ रोजी)

प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरुद्ध महाराष्ट्र प्रतिबंधक कायदा १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये दोषारोप पत्र दाखल आहे.

०२. प्रस्तुत प्रकरणात गु.र.क्र./२२/२०१९ पोलीस ठाणे, पाटण येथे नोंदवुन तपास श्री. जमीर शेख यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे बयाण नोंदवीले व तपासाअंति दोषारोपपत्र दाखल केले.

०३. आरोपींविरुद्ध महाराष्ट्र प्रतिबंधक कायद्याचे कलम ६५(ई) अन्वये गुन्ह्याचा तपशील (नि.क्र.१२) नोंदविण्यात आला. आरोपींनी प्रतिकथन नाकारल्यामुळे त्यांच्याविरुद्ध खटला चालविण्यात आला . अभिलेखावर आरोपींविरूद्ध कोणताही गुन्हादर्शक पुरावा मिळून आला नसल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रीया संहिताचे कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन वगळण्यात आले.

०४. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. निर्णीतीसाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील निष्कर्ष व निष्कर्षाची कारणमिमांसा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोजन पक्ष असे सिद्ध करतो काय की , दि. ०५/०८/२०१९ रोजी १६.०० ते १८.०० च्या दरम्यान मौजा नाईकनगर शेतशिवार, ता. जिवती, | |

| | |
|---|---|
| जिल्हा चंद्रपूर येथे आरोपी संगनमताने त्यांच्या ताब्यात विना परवाना बेकायदेशीररित्या ०५ लिटर मोहा दारू चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगतांना मिळून आले ? | **नकारार्थी** |
| २. आदेश काय ? | **अंतीम आदेशानुसार** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**०५.** आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे पंचसाक्षीदार सा.क्र.१ प्रकाश सोनेराव उईके व सा.क्र.२ किसन नागोराव मेश्राम यांची साक्ष नोंदविण्यात आली. **<u>नि.क्र.१</u>** वर आदेश पारीत करुन सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**<u>मुद्दा क्र. १ करीता</u>** :–

**०६.** पंच साक्षीदार सा.क्र.१ प्रकाश सोनेराव उईके व सा.क्र.२ किसन नागोराव मेश्राम यांच्या साक्षपुराव्यात असे आले आहे की, ते आरोपींना ओळखत नाहीत. पोलीसांनी त्यांना पंचनाना करण्याकरीता बोलावीले नाही. त्यांच्या समक्ष कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. त्यांनी घटनास्थळ कम जप्ती पंचनाम्यावर त्यांच्या सह्या असल्याचे मान्य केले, परंतु त्यातील मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शवीली. सदरील दोन्ही साक्षिदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी अधिवक्त्यांनी त्यांना उत्तरसूचक प्रश्न विचारले, परंतु त्यात काहीही निष्पन्न झाले नाही.

**०७.** प्रस्तुत खटल्यात आरोपीने त्यांच्याजवळ बेकायदेशीर विनापरवाना दारू बाळगल्याचे अभियोग पक्षातर्फे सिद्ध करणे अत्यंत महत्वाचे आहे. साक्षीदाराच्या साक्षेचे

अवलोकन केले असता असे दिसून येते की, सा.क्र.१ प्रकाश व सा.क्र.२ किसन यांनी अभियोग पक्षाला सहकार्य केलेले नाही. अभियोग पक्षाला पुरेशी संधी देऊनसुद्धा, अभियोग पक्ष इतर साक्षीदारांना हजर ठेऊन त्यांची साक्ष नोंदविण्यास असमर्थ ठरला . करीता फिर्याद, छापील प्रथम खबर अहवाल व त्यामधील मजकूर सिद्ध झाला नाही. प्रस्तुत प्रकरणात रासायनिक पृथःकरणाचा अहवाल अभियोग पक्षाने दाखल केला असल्यामुळे, जप्त करण्यात आलेले द्रव्य ही दारू होती, ही बाब सिद्ध होते. परंतु, जप्त करण्यात आलेले द्रव्य दारू हे आरोपीच्या ताब्यातूनच जप्त केले , ही बाब पंचनामे सिद्ध न झाल्यामुळे संशयापलीकडे सिद्ध होत नाही. त्यामुळे आरोपी त्यांच्याजवळ बेकायदेशीर दारू बाळगून विक्री करीत होते, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले नाही. करीता मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u> :–**

०८. मुद्दा क्र.१ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरुन आरोपीची निर्दोष मुक्तता करणे योग्य होईल. जप्त मुद्देमाल ०५ लिटर हातभट्टी दारूपैकी सी.ए. करीता एक १८० मि.ली. ची एक बाटली वगळता उर्वरीत दारू घटनास्थळी नाश करण्यात आली. सबब, मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

## आदेश

१. आरोपी क्र.१ रविंद्र रामजी पवार व आरोपी क्र.२ अरूण मेरचंद चव्हाण यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे

कलम ६५(ई) सहकलम ८३ खालील आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्त मुद्देमाल ०५ लिटर हातभट्टी दारूपैकी सी.ए. करीता एक १८० मि.ली. ची एक बाटली वगळता उर्वरीत दारू घटनास्थळी नाश करण्यात आली.

३. आरोपींचे जात मुचलके व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

४. आरोपींनी प्रत्येकी रक्कम रु.१५०००/– चे वैयक्तीक बंधपत्र देऊन फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम ४३७–अ अन्वये पुर्तता करावी.

**(न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VIDYA SHRIPATI KASBE
Date: 2023.01.09 17:44:53 +0530

**(विद्या एस. कसबे)**

**दिनांक :– ०९/०१/२०२३**

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**

**स्थळ :– राजुरा**

**राजुरा, जिल्हा चंद्रपूर**